# “ऊसाला चांगले फुटवे येत नाहीत”



देवदर्शन घेऊन गणपत पारावर बसला होता. आज बराच वेळ झाला तरी संपत आला नव्हता, तेव्हा थोडासा कंटाळलाच होता गणपत. संपतला येताना बघून गणपत म्हणाला, “संपा, ये लवकर देवदर्शन करून केव्हाची वाट पाहतोय तुझी.”

संपत हसतच मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घेऊन गणपतच्या जवळ येऊन बसला व म्हणाला,

“का रं गंपा, आज लवकरच आलेला दिसतोय. फार वैतागलेला दिसतोय माझी वाट बघून!”

तसा हसून गणपत म्हणाला, “तसं काही नाही संपा. आटोपलं लवकर घरचं काम, मग आलो गावात. तसं बी कालपासून माझ्या डोक्यात खटका होताच. त्यामुळे रात्रीबी चांगली झोप नाही आली. मग सकाळी लवकरच उठून आटोपलं बघ.”

यावर संपत हसून म्हणाला, “कारं गंपा, कोणते खटके डोक्यात ठेवून झोपतो? निवांत झोपायचं सोडून काहीबी विचार करत झोपला म्हणजे झोप येणारच नाही ना!”

त्यावर गणपत म्हणाला, “तसं नाही रं संपा. पण आता दोन महिने उलटून गेले बघ ऊसाच्या लागवडीला. ऊस नुसता उभाच वाढून राहिलाय, पार गुडघा- मांडीला शिवलाय पण त्याला अजून फुटवेच येईना बघ. मागील १५ दिवसांपासून बघतोय पण काहीही सुधारणा झाली नाही. नुसता एकसडीच धावलाय ऊस. दुकानदार म्हणाला, अमोनियम सल्फेट टाक त्यामुळे ऊसाला जास्त फुटवे येतील. मी एक गोणी अमोनियम सल्फेट टाकले पण फुटवे काही आले नाहीत. आता त्याच चिंचेत होतो. कालपासून विचार करत होतो की आता काय करावे ते. काही जण म्हणाले, ऊसाचे शेंडे काप, काही म्हणाले ऊसाला माती लाव. पण नेमकं काय करावं तेच कळत नाही झालं बघ.”

संपत यावर म्हणाला, “हे बघ गंपा, तू ऊसाची लागवड केली आहे जून महिन्याच्या सुरुवातीला. सुरुवातीला पाऊस झाला, थोडी उष्णता होती त्यामुळे ऊसाची उगवण चांगली झाली. आता पाहिले असेल की मागील महिन्यापासून आकाशात नुसते ढग आहेत. उन्हाचा तपास नाही. हवेत कधी गारवा तर कधी ताप आहे. यामुळे ऊसाची वाढ सुरू झाली. उगवलेला ऊस उभा सरळ वाढायला लागला, ऊसाला फुटवे येण्यासाठी ऊसाच्या खोडाजवळ ऊन पडलं पाहिजे. एक तर मागील एक महिन्यापासून ऊनच नाही. बरं थोडंफार ऊन पडलं तर आता उभ्या वाढलेल्या ऊसाच्या पानांमुळे ऊन ऊसाच्या खोडापर्यंत पोहोचत नाही. ऊन ऊसाच्या खोडावर पोहोचलं तरच ऊसाच्या खालच्या कांड्यांवरील डोळे

सक्रिय होऊन ते उगवतात. त्यालाच आपण फुटवे म्हणतो.''

गणपतने मध्येच संपतला थांबवून विचारले, ''मग आता माझ्या ऊसाला फुटवे येणारच नाहीत काय? कारण ऊस तर उभा वाढलाय, त्यात सूर्यप्रकाश नाही.''

यावर हसून संपत म्हणाला, ''तसं नाही गंपा, ऊसाला फुटवे येतील पण त्यासाठी आता काही महत्त्वाच्या बाबी करणे गरजेचे आहे. ऊस लहान असेल तर तो देठासह कापून घ्यावा. ऊस थोडा मोठा असेल तर त्याची देठाजवळून वरची सर्व पाने कापून टाकावी. यामुळे दोन गोष्टी होतील, एक तर ऊसाचा शेंडा कापल्यामुळे ऊसाची उभी वाढ थांबेल. त्यामुळे ऊसाच्या खोडाकडील कांड्यांवर असलेल्या डोळ्यावर सूर्यप्रकाश पडेल. त्यामुळे हे डोळे सक्रिय होऊन उगवतील. हे उगवलेले डोळे फुटवे म्हणून जमिनीच्या बाहेर येतील. ऊसाचा मुख्य शेंडा कापल्यामुळे या फुटव्यांच्या वाढीला जोर मिळेल. अशा वेळी ऊसाला माती लावणे गरजेचे आहे. तसेच तू म्हणाला तसे अशा वेळी अमोनियम सल्फेटचा वापर केला तर फुटव्यांची वाढ चांगली होते. अर्थात या सर्व गोष्टी करत असताना पावसात थोडी उघडीप तसेच थोडे ऊन असेल तर त्याचा चांगला फायदा होतो.''

संपतच्या या बोलण्यामुळे गणपतच्या चेहऱ्यावर थोडा आनंद दिसत होता. तो म्हणाला, ''पण मला एक सांग संपा, मागील वर्षी ज्या शेतकऱ्यांनी जून महिन्यात ऊसाची लागवड केली त्यांच्याही ऊसाला फुटवे आले नव्हते. ऊस कंबरेपर्यंत वाढला आणि फुटवे आले नाही म्हणून त्यांनी पाने कापली. माझ्या मते त्यांनी ऑगस्ट महिन्यात पाने कापली. परंतु एवढे करूनही त्यांच्या ऊसाला कमीच फुटवे आले. बरं मी बघितलं की काहींच्या ऊसाला चांगले फुटवे आले परंतु ज्या मुख्य ऊसाची पाने कापली होती त्या ऊसाची वाढ पाहिजे तशी झाली नाही तसेच त्या ऊसाला पागऱ्या आल्या, मुख्य ऊस बारीकच राहिला. त्यापेक्षा फुटवे जाड आणि उंच झाले. मला तर काही कळले नाही, असे का झाले ते! म्हणून मी माझ्या ऊसाचा पोक कापायचा की नाही याचा विचार करतोय.''

यावर संपत म्हणाला, ''आरं गंपा, प्रत्येक बाबतीत हे असं का झालं, ते तसं का झालं याचा थोडा शास्त्रीय पद्धतीने विचार करत जा की. उगाच त्याने केले म्हणून आपण अंधानुकरण करू नये. हे बघ, तुझा ऊस आता ५०-६० दिवसांचा झाला. तुझ्या ऊसाने अडकन कोठेही धरले नाही. म्हणजे तू तुझ्या ऊसाची पाने कापण्यापेक्षा त्याचा मुख्य कोंब कापून घे. यामुळे एक तर जमिनीवर पडलेल्या सर्व सूर्यप्रकाशाचा वापर ऊसाला करता येईल. त्यामुळे ऊसाला लवकर फुटवे येतील. त्यांची वाढही झटपट होईल. त्यामुळे जो मुख्य कोंब कापला आहे तो आणि फुटवे एकाच प्रकारे वाढतील. अनेकदा हा कोंब थोडा वाढून नंतर जळतो किंवा वाढला तर एकसारखा वाढतो. ऊसाचे कांडे धरले असले तर मग मात्र ऊसाची पाने कापावी लागतात. अशा वेळी फुटवे येतात परंतु ज्या ऊसाची पाने कापलेली असतात त्यांची जर चांगली वाढ झाली नाही किंवा वाढ खुंटली तर मात्र त्यावर पागऱ्या येतात. म्हणूनच तुला म्हणतो गंपा की, शेती करत असताना अंधानुकरण न करता थोडासा शास्त्राचा विचार करत जा. मागील दोन-तीन वर्षांपासून वातावरणात बदल झालाय. आपल्याकडे जून- जुलै महिन्यांत जास्त ढगाळ वातावरण असतं. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये ऊसाला फुटवे येत नाहीत याचा विचार करायला पाहिजे. मी तर ऊसाची लागवड १५ ऑगस्टनंतरच करतो. कारण तोपर्यंत पाण्याचा अंदाज येतो. तसेच ऊसाला चांगले फुटवेही येतात. ज्याच्या त्याच्या जमिनीनुसार, हवामानानुसार त्या त्या भागातील ऊसाच्या लागवडीचा हंगाम ठरवावा, तोही अनुभवावरच .''

यावर मात्र गणपतने होकारार्थी मान हलवून तो संपतला म्हणाला, ''आता कळले बघ संपा, नेमकं माझं काय चुकलं ते! पण तू म्हणतो तसं सर्व करून माझी चूक सुधारतो. चल आजच करतो ऊसाची पुनर्रचना.''

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**